<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, ३ रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दिनांक ०२ फेब्रुवारी २०१५.

<u>**निवेदन पत्रिका**</u>

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, मा. महापौरांनी निश्चित केल्यानुसार, <u>**महानगरपालिकेची फेब्रुवारी २०१५ ची दुसरी सर्वसाधारण सभा, बुधवार, दिनांक १८ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह**</u> येथे भरेल.

२. महापालिका सदस्यांना अशी विनंती करण्यांत येते की, फेब्रुवारी २०१५ महिन्याच्या दुसऱ्या सर्वसाधारण सभेत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४४ अन्वये, आयुक्तांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न **(जास्तीत जास्त ५ (पाच) )** आणि ठराव मांडावयाचे असल्यास ठरावाच्या सूचना **(जास्तीत जास्त ३ (तीन) )** <u>**महापालिका सचिव**</u> यांचेकडे खालील तारखांच्या आत सचिव कार्यालयाच्या आवक विभागात पोहोचतील अशा रितीने पाठविण्यांत यावेत :-

| | |
|---|---|
| १. ठरावाच्या सूचना. | : शनिवार, दि. ०७ फेब्रुवारी २०१५ पर्यंत. |
| २. महाराष्ट्र म.अधि.कलम ४४ अन्वये विचारावयाचे प्रश्न. | : शनिवार, दि. ०७ फेब्रुवारी २०१५ पर्यंत. |

**मा.महापौरांच्या आदेशावरुन,**

सही/-
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव (प्र),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**